महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला व वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांना ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) अंतर्गत सेंद्रीय संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेले अनुदान वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक : कृ षिवि -३७१७/प्र. क्र. १२२/७-अे,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : ०१ मार्च, २०१८.

वाचा :- १) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्रमांक - कृषिवि-३७१७/(४०/२०१७), दिनांक २६ एप्रिल, २०१७,
२) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्रमांक - कृषिवि-३७१७/(४०/२०१७), दिनांक ३१ मे, २०१७,
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक-पूरक -२०१७/प्र.क्र.१२९/अर्थ-३, दिनांक १८ ऑगस्ट, २०१७,
४) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्रमांक - मफुवि-१४१७/(७४/२०१७), दिनांक ०७ सप्टेंबर, २०१७,
५) शासन निर्णय, कृषि व पदुम विभागक्रमांक - कृषिवि-३७१६/(४८/२०१७)८-अे, दिनांक २३ ऑगस्ट, २०१७,
६) नियंत्रक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांचे जा.क्र.मफुकृवि/नियंत्रक/लेखा-२/७१२/२०१७, दिनांक ०३/११/२०१७,
७) नियंत्रक, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचे .क्र.डॉबासाकोकृवि/लेखा-२/५३९/२०१७, दिनांक ०२ नोव्हेंबर, २०१७,
८) नियंत्रक, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचे जा.क्र.अप्रवि/अंदाज/पुमा/११८७/२०१७, दिनांक ४/११/२०१७,
९) नियंत्रक,वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी यांचे जा.क्र.सिएफबी/१०८१/१७, दिनांक ०३/११/२०१७
१०) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक - पूरक -२०१७/प्र.क्र.१२९/अर्थ-३, दिनांक १८ ऑगस्ट, २०१७,
११) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक-पूरक -२०१७/प्र.क्र.३३५/अर्थ-३, दिनांक २९ डिसेंबर, २०१८,
१२) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक - अर्थसं - २०१७/प्र.क्र.७५/अर्थसंकल्प-३, दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१८,

शासन निर्णय :-

महाराष्ट्र विधानमंडळाच्या डिसेंबर, २०१७ च्या हिवाळी अधिवेशनात मंजूर झालेल्या पुरवणी विनियोजन विधेयकास मा.राज्यपालांनी संमती दिली असून ते महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन अधिनियम, २०१७ (सन

२०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक - ६२) म्हणून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण, भाग - ४, दिनांक २१ डिसेंबर, २०१७ यामध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे. सदर अधिनियमान्वये सन २०१७ -१८ या आर्थिक वर्षात सेंद्रीय संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला व वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांना " मागणी क्रमांक डी - ३, २४१५ कृषि विषयक संशोधन व शिक्षण" या मुख्य लेखाशीर्षाखाली "०१ पीक संवर्धन (२४१५ ००७२), (२४१५ ००८१), (२४१५ ००९९) व (२४१५ २४१५०१०५)" या उपशीर्षांतर्गत "३१- सहायक अनुदाने (वेतनेतर)" या बाबीखाली रु. ६०९.३६ लक्ष इतके अनुदान पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यांत आले आहे. सदर मंजूर रक्कमेपैकी ८०% मर्यादेत महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांना रुपये १२१.८७ लक्ष, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांना रुपये १२१.८७ लक्ष, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना रुपये १२१.८७ व वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांना रुपये १२१.८७ लक्ष असे एकूण रु.४,८७,४८,०००/- (रुपये चार कोटी सत्याऐंशी लक्ष आठ्ठेचाळी हजार फक्त) इतके अनुदान वितरीत करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

अटी व शर्ती :-

१) पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यांत आलेला निधी संदर्भ क्रमांक ६, ७, ८ व ९ च्या पत्रान्वये विनंती केल्यानुसार मंजूर करण्यात आलेला आहे. वितरीत करण्यात येणारा निधी संदर्भ क्रमांक ५ अन्वये मान्यता देण्यात आलेल्या बाबींसाठीच निधी खर्च करावा.

२) प्रशासकीय विभागाने निधीचे वितरण करतांना तसेच तो खर्च करतांना महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका व वित्तीय अधिकारी नियम पुस्तिकेमध्ये उल्लेख केलेल्या तसेच नियोजन व वित्त विभागाने यापूर्वी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व प्रचलित निकष, वित्तीय अधिकारांचे प्रत्यायोजन तसेच वित्त विभागाच्या दि.१८ एप्रिल, २०१७, दि.३० जून, २०१७, दि.८ ऑगस्ट, २०१७, दि.२९ जानेवारी, २०१८ व दि.०१ फेब्रुवारी, २०१८ च्या परिपत्रकातील अटी व शर्तीचे व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

३) या व्यतिरिक्त, आर्थिक वर्षाच्या अखेरीस खरेदी करावयाच्या प्रस्तावासंदर्भातील कार्यवाहीबाबत या विभागाच्या क्र.संकिर्ण-२०१८/प्र.क्र.१७/१८/कोषा.प्रशा-५, दि.२५ जानेवारी, २०१८ च्या शासन परिपत्रकातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

४) सदर निधी हा ज्या योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे त्याच योजनांसाठी खर्च करण्यात यावा. प्रशासकीय मान्यता नसलेल्या योजनांसाठी सदर निधी खर्च करण्यात येऊ नये.

५) विद्यापीठाने उपलेखाशिर्ष / गट / योजना आणि बाबनिहाय वितरीत केलेला निधी संबंधित योजनेतील जी पदे / बाबी, योजनांतर्गत योजना म्हणून पुढे चालू ठेवण्यास शासनाने मान्यता दिली आहे, त्या पदांचे वेतन व भत्ते आणि अनुज्ञेय बाबींसाठीच फक्त खर्च करावा. काही पदे रिक्त असल्यामुळे अथवा अन्य बाबी / कारणांमुळे एखाद्या योजनेखाली अनुदान अखर्चित राहिल्यास, सदर अनुदान पुढील महिन्यामध्ये वितरीत करण्यात येणा-या अनुदानामध्ये समायोजित करावे.

६) उपलेखाशिर्षनिहाय, गटनिहाय, योजनानिहाय व बाबनिहाय वितरीत केलेला निधी कोणत्याही कारणास्तव अखर्चित / शिल्लक राहिला / राहणार असेल तर सदर अखर्चित / शिल्लक निधी शासनाचे मान्यतेशिवाय इतर गटांसाठी / योजनांसाठी / बाबींसाठी परस्पर वर्ग करु नये किंवा खर्च करु नये.

७) उपलेखाशिर्षनिहाय मंजूर योजनांचे व त्या अंतर्गत मंजूर असलेल्या पदांचे सुधारित आकृतीबंधानुसार व्यवस्थितरित्या गटनिहाय वर्गीकरण केले आहे किंवा कसे याची कृषि परिषदेने / विद्यापीठाने सखोल तपासणी करावी. सदर वर्गीकरणामध्ये शासनाच्या मान्यतेशिवाय कोणतेही बदल करु नयेत.

८) प्रत्येक गटामधील वितरीत केलेले सहाय्यक अनुदान आणि महसूली उत्पन्न त्या गटातील अनुज्ञेय बाबींवरील खर्च भागविण्यासाठी आणि विकास कामे करण्यासाठी उपयोगात आणावे. एका गटाचे सहाय्यक अनुदान आणि महसूली उत्पन्न दुस-या गटातील योजनां / बाबींसाठी वर्ग करु नये. एखाद्या गटातील योजनेसाठी जास्त सहाय्यक अनुदान वितरीत झाले असेल तर, पुढील निधीची मागणी करताना सदर जास्तीचे अनुदान विचारात घेऊन तेवढ्या कमी व अनुज्ञेय निधीची मागणी करावी.

९) शासनाने मंजूर केलेल्या पदांपैकी जी पदे महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ आणि महाराष्ट्र कृषि विद्यापीठ परिनियम १९९० मधील तरतूदीप्रमाणे भरलेली आहेत व सदर पदे योजनेतर खर्चाने पुढे चालू ठेवण्यासाठी शासनाने मान्यता दिली आहे, अशा पदांच्या वेतन व भत्त्यांसाठीच विहीत अनुदान देय राहील.

१०) प्रत्येक उपलेखाशीर्ष / गट / योजना आणि बाब निहाय स्वतंत्र लेखे / हिशोब ठेवावेत.

११) महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेने विद्यापीठास मंजूर केलेले सहाय्यक अनुदान, अनुदान सूत्राप्रमाणे बरोबर आहे किंवा कसे, तसेच विहीत आदेश / कार्यपध्दतीनुसार खर्च करण्यात येत आहे किंवा कसे, याबाबत प्रत्येक आर्थिक वर्षाचा मूल्यमापन अहवाल शासनास संबंधित आर्थिक वर्ष समाप्त झाल्यापासून तीन महिन्यांच्या कालावधीत सादर करावा. तसेच, मागील आर्थिक वर्षाचा अखर्चित निधी किती आहे हे तात्काळ शासनास कळवावे.

१२) शासनाने विद्यापीठाच्या काही नवीन योजनांना मान्यता देताना, सदर योजनेमधील पदे अंतर्गत समायोजनाने उपलब्ध करण्यास/भरण्यास मान्यता दिलेली आहे. यामुळे सदर नवीन योजनेसाठी नवीन पदे निर्माण झाल्यामुळे, ज्या योजनेतर / योजनांतर्गत मूळ योजनांमधील पदे अंतर्गत समायोजनाने नवीन योजनेकरिता वर्ग / उपलब्ध केली असतील, त्या मूळ योजनांमधील पदांचे वेतन व भत्यासाठी या आदेशान्वये वितरीत केलेला निधी खर्च करु नये. तसेच तिमाही अनुदानाची मागणी करताना, अशा पदांचे वेतन व भत्यासाठी लागणा-या निधीची मागणी करु नये.

१३) कृषि विद्यापीठास त्यांचे महसूली उत्पन्न वापरण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. याबाबत विद्यापीठाने विहित आदेश आणि कार्यपध्दतीनुसार उचित कार्यवाही करावी. तसेच महसूली उत्पन्न वाढविण्याच्या योजना राबविण्याबाबत कार्यवाही करावी.

१४) विद्यापीठास मंजूर करण्यात आलेले अनुदान महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३, महाराष्ट्र कृषि विद्यापीठ परिनियम १९९० आणि महाराष्ट्र कृषि विद्यापीठ लेखा संहिता १९९१ मधील तरतूदीप्रमाणे आणि **प्रचलित शासन आदेश व विहित कार्यपध्दतीनुसार सक्षम अधिका-यांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेतल्यानंतर विहित मर्यादेत खर्च करण्यात यावे. केवळ अर्थसंकल्पीय तरतूद आहे किंवा अनुदान वितरीत केले आहे म्हणून खर्च करु नये.**

१५) सन २०१७-१८ मधील अनुदानाची मागणी करताना, विद्यापीठाने दरमहा १० तारखेपर्यंत योजनानिहाय वितरीत केलेले अनुदान, प्रत्यक्ष खर्च आणि शिल्लक अनुदान याबाबतचा अहवाल सादर करावा. यापुढे अनुदानाची मागणी सादर करताना, पूर्वी वितरीत केलेल्या अनुदानातील शिल्लकीची प्रस्तावित मागणीशी सांगड घालून, प्रत्यक्षात आवश्यक तेवढ्याच अनुदानाची मागणी करण्यात यावी.

१६) नियमबाह्य योजना, पदे आणि बाबींसाठी खर्च करु नये.

१७) विद्यापीठाच्या नियंत्रक आणि इतर संबंधित सक्षम प्राधिका-यांनी उपरोक्त अटी व शर्तींचे काटेकोरपणे अनुपालन करावे.

१८) उप विभागीय कृषि अधिकारी, अहमदनगर यांनी वरीलप्रमाणे "०१ पीकसंवर्धन" (२४१५ ००७२) या उपशीर्षांतर्गत पुरवणी मागणीव्दारे मंजूर करण्यात आलेले रु.१,२१,८७,०००/-(रुपये एक कोटी एकवीस लक्ष सत्याऐंशी हजार फक्त), नियंत्रक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, यांना अदा करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

उप विभागीय कृषि अधिकारी, दापोली यांनी वरीलप्रमाणे "०१ पीकसंवर्धन" (२४१५ ००८१) या उपशीर्षांतर्गत पुरवणी मागणीव्दारे मंजूर करण्यात आलेले रु.१,२१,८७,०००/-(रुपये एक कोटी एकवीस लक्ष सत्याऐंशी हजार फक्त), नियंत्रक, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांना अदा करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

उप विभागीय कृषि अधिकारी, अकोला यांनी वरीलप्रमाणे "०१ पीकसंवर्धन" (२४१५ ००९९) या उपशीर्षांतर्गत पुरवणी मागणीव्दारे मंजूर करण्यात आलेले रु.१,२१,८७,०००/- (रुपये एक कोटी एकवीस लक्ष सत्याऐंशी हजार फक्त), नियंत्रक, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना अदा करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

उप विभागीय कृषि अधिकारी, परभणी यांनी वरीलप्रमाणे "०१ पीकसंवर्धन" (२४१५ ०१०५) या उपशीर्षांतर्गत पुरवणी मागणीव्दारे मंजूर करण्यात आलेले रु रु.१,२१,८७,०००/- (रुपये एक कोटी एकवीस लक्ष सत्याऐंशी हजार फक्त), नियंत्रक, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांना अदा करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

१९) या प्रित्यर्थचा खर्च सन २०१७-२०१८ च्या अंदाजपत्रकात खालील लेखाशीर्षाखाली मंजूर केलेल्या तरतूदीतून मासिक निधी विवरणपत्राच्या मर्यादेत भागवावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

मंजूर अनुदान	लेखाशिर्ष
रु. १,२१,८७,०००/-	मागणी क्रमांक डी-३ २४१५ कृषि विषयक संशोधन व शिक्षण ०१ पीकसंवर्धन, १२०, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना (००) (०६) महात्मा फुले कृषि विद्यापीठाला सहाय्यक अनुदान ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) दत्तमत (२४१५ ००७२)
रु. १,२१,८७,०००/-	मागणी क्रमांक डी-३ २४१५ कृषि विषयक संशोधन व शिक्षण ०१ पीकसंवर्धन, १२०, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना (००) (०७) डॉ.बाळासाहेब सावंत कृषि विद्यापीठाला सहाय्यक अनुदान ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) दत्तमत (२४१५ ००८१)
रु. १,२१,८७,०००/-	मागणी क्रमांक डी-३ २४१५ कृषि विषयक संशोधन व शिक्षण ०१ पीकसंवर्धन, १२०, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना (००) (०८) डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाला सहाय्यक अनुदान ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) दत्तमत (२४१५ ००९९)

रु. १,२१,८७,०००/-	मागणी क्रमांक डी-३ २४१५ कृषि विषयक संशोधन व शिक्षण ०१ पीकसंवर्धन, १२०, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना (००) (०९) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाला सहाय्यक अनुदान ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) दत्तमत (२४१५ ०१०५)

हे आदेश महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका (भाग-१) १९७७ मधील परिच्छेद १४२ व १४४ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या शक्तीनुसार वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३१/२०१८/व्यय-१, दिनांक २०/०२/२०१८ आणि अनौपचारिक संदर्भ क्रमांक १०९/१८/अर्थसंकल्प-१३, दिनांक २०/०२/२०१८ अन्वये दिलेल्या मंजूरीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१८०३०११७३११४०५०१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Devappa Annappa Gavade

Digitally signed by Devappa Annappa Gavade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=eb6891ac4984581cb912dab1f553c065a5dd35da6c8e7cf4f22d8f94fa5f56d7, serialNumber=d00367c67d2ea5a7aecea40a3081cba4d043b40cc7b0ef510250b3ea4f9795d6, cn=Devappa Annappa Gavade
Date: 2018.03.03 10:51:14 +05'30'

(दे.आ.गावडे)
सहसचिव , महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. महासंचालक/सल्लागार (वित्त) महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे,
२. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक/उपअभियंता,महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी,
३. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक/उपअभियंता,डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली,
४. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक/उपअभियंता, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला,
५. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक/उपअभियंता, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी,
६. कृषि आयुक्त, (अेजी १० सेल) महाराष्ट्र राज्य, पुणे (खर्च ताळमेळ शाखा),
७. उपविभागीय कृषि अधिकारी, अहमदनगर / दापोली / अकोला / परभणी,
८. महालेखापाल, महाराष्ट्र १ / २ (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर,
९. जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर / दापोली / अकोला / परभणी,
१०. उपकोषागार अधिकारी, राहूरी / दापोली / अकोला / परभणी,
११. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई,
१२. उप मुख्य लेखा परिक्षक (वरिष्ठ) स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई,
१३. जिल्हा लेखा परिक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
१४. जिल्हा लेखा परिक्षा अधिकारी,स्थानिक निधी लेखा, डॉ.बा.सा.कोकण कृषि विद्यापीठ,दापोली,
१५. जिल्हा लेखा परिक्षा अधिकारी,स्थानिक निधी लेखा,डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला,
१६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई,
१७. वित्त विभाग (व्यय-१ / अर्थ-१३), मंत्रालय, मंबई - ४०० ०३२,
१८. कक्ष अधिकारी, कार्यासन २अे / ६अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
१९. कार्यासन ७-अे (निवडनस्ती), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.